दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
# रायगड नगरी
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित
• वर्ष १७ वे • अंक १२ • MAHMAR/2006/17212 • रायगड • बुधवार दि.१३ एप्रिल २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# जेएनपीएच्या शॉलो बर्थ ड्रेझिंग बार्जमध्ये भीषण स्फोट २ कामगार ठार ; २ बेपत्ता

**दै.रायगड नगरी । उरण**

जेएनपीएच्या शॉलो वाटर बर्थ जवळ असलेल्या ड्रेझिंग बार्जमध्ये पेंटिंगचे काम सुरू असताना अचानक ठेवण्यात आलेल्या अत्यंत ज्वलनशिल थीनरला आग लागून भीषण स्फोट झाल्याची घटना घडली. या स्फोटात २ कामगार मरण पावले आहेत. तर दोन कामगार बेपत्ता झाल्याचे सदर कामगारांकडून सांगण्यात येत आहे.

जेएनपीएच्या शॉलो वाटर बर्थ जवळ मागील पाचसहा महिन्यांपासून रो-रो सर्व्हीस जेट्टीचे काम सुरू आहे. यासाठी समुद्रात खोली वाढविण्यासाठी ड्रेझिंगचे काम सुरू आहे. हे काम परेश इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. या खासगी कंपनीकडून केले जात आहे. या कंपनीकडून ड्रेझिंग बार्जच्या दुरुस्तीचे काम सुरू आहे. या बार्जमध्ये पेंटिंग्जचे काम करण्यासाठी सहा कामगार उतरले होते. पेटिंग्जचे काम सुरू असतानाच ६-३० वाजताच्या सुमारास रंगात मिसळण्यासाठी ठेवण्यात आलेल्या अत्यंत ज्वलनशिल थीनरला आग लागण्याची दुदैवी घटना घडली. पेंटिंग्जच्या कामामुळे याआधीच बार्जमध्ये मोठ्या गॅस निर्माण झाला होता. ज्वलनशिल तरल थीनरचे डबे आणि गॅसने पेट घेतला. या आगीमुळे भीषण स्फोट झाला असून या स्फोटात अब्दुल सलाम (२१) हा कामगार जागीच ठार झाला. तर हिरालाल प्रजापती (२५) हा कामगार ९० टक्के



भाजल्याने त्याला जेएनपीटी ट्रॉमा सेंटर मधुन ऐरोली येथील बर्न इस्पितळात उपचारासाठी पाठविण्यात आले असता उपचारा दरम्यान मुत्यू पावला आहे. गंभीररित्या जखमी झालेल्या अनुज राजवीर सिंह (२३) या कामगारांवर जेएनपीटी रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती डॉ.बी.एस.देसाई यांनी दिली. अन्य दोन कामगार मनिष (२२) व बालक (२२) बेपत्ता असुन त्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न सुरु आहे. असे कामगारांकडून सांगण्यात येत आहे. या बार्जमध्ये एकूण सहा कामगार काम करीत होते अशी माहिती जखमी कामगार अनुज राजवीर सिंह यांनी दिली आहे.

याप्रकरणी न्हावा- शेवा बंदर पोलीस ठाण्याकडे विचारणा केली असता, त्यांच्याकडून तपास सुरू आहे. असे सांगण्यात येत आहे. त्यामुळे सदर ठेकेदाराला वाचविण्यासाठी न्हावा शेवा पोलीस ठाण्याचा तपास संशयास्पद वाटत आहे.

# प्रत्येक घरी नळाने पाणी योजनेचे काम वेगाने पूर्ण करावे : मुख्यमंत्री



**दै.रायगड नगरी । मुंबई**

पाणी हे जीवन आहे, प्रत्येक घरी नळाने पाणीपुरवठा करणाऱ्या योजनेला प्राधान्य देऊन येत्या दोन वर्षात अधिक वेगाने ही योजना पूर्ण करावी आणि खेड्यापाड्यातील जनतेला दिलासा द्यावा, असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे म्हणाले.

राज्यात ग्रामीण कुटुंबांना नळाने पाणी पुरविण्याचे ७१ टक्के उद्दिष्ट पूर्ण झाले आहे अशी माहिती यावेळी देण्यात आली. वर्षा निवासस्थानी जलजीवन मिशन आढावा बैठक झाली. यावेळी पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, राज्यमंत्री संजय बनसोडे, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव आशिष कुमार सिंग, प्रधान सचिव विकास खारगे, मुख्यमंत्री यांचे सल्लागार सीताराम कुंटे, सचिव संजीव जयस्वाल,महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव अभिषेक कृष्णा, जलजीवन मिशन अभियान संचालक ह्रषिकेश यशोद तसेच पाणी पुरवठा विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री उद्धव ठाकरे म्हणाले, पाणी पुरवठा योजना सुरळीतपणे सुरू राहण्यासाठी पाणीपुरवठा व्यवस्थापनाचा सर्वांगीण विचार होणे गरजेचे आहे. जलजीवन मिशन अंतर्गत राज्यात पाणीपुरवठा योजनांची कामे प्रगतीपथावर असून उर्वरित कामेही वेगाने पूर्ण करण्यात यावीत. योजनांच्या देखभाल-दुरुस्तीवर विशेष भर देण्यात यावा, असे निर्देशही श्री ठाकरे यांनी दिले.

पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील म्हणाले, पाणी पुरवठा योजना सुरळीतपणे सुरू ठेवण्यासाठी या योजनांच्या देखभाल दुरुस्तीवर विशेषत्वाने भर देण्यात येत आहे. जलजीवन मिशन अंतर्गत महाराष्ट्र राज्य अग्रेसर असून मिशन अंतर्गतची कामे वेगाने पूर्ण होतील. जलजीवन मिशन अंतर्गत घरगुती नळजोडणी, पाणी गुणवत्ता, संस्थात्मक नळजोडणी व हर घर जल गावे घोषित करण्याच्या उद्देशाने विशेष मोहिमही राबवण्यात आली आहे.

पाणी पुरवठा राज्यमंत्री संजय बनसोडे म्हणाले, जलजीवन मिशन अंतर्गत ग्रामीण भागातील कुटुंबांपर्यंत घरगुती नळ जोडणीसह पुरेशा प्रमाणात निर्धारित गुणवत्तेसह पाणी पोहचवण्याचे उद्दिष्ट आहे. जल जीवन मिशन अंतर्गत राज्यात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणासह सर्वच यंत्रणाव्दारे पाणीपुरवठा योजनांची कामे वेगात सुरू असल्याचे सचिव संजीव जयस्वाल यांनी सांगितले.

जल जीवन मिशन हा केंद्र शासनप्रणीत ५०:५० टक्के सहभागावर आधारित कार्यक्रम आहे. जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक सूचनांनुसार केंद्र शासन देशातील ग्रामीण भागातील सर्व कुटुंबाना सन २०२४ पर्यंत हर घर नल से जल प्रमाणे पाणी पुरवठा करण्यास कटिबध्द आहे. राज्यातही जल जीवन मिशन राबविण्यात येत आहे.

सन २०२४ पर्यंत राज्यातील ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबास वैयक्तिक नळ जोडणीद्वारे कमीत कमी ५५ लिटर प्रति माणसी, प्रति दिन गुणवत्तापूर्ण पाणी पुरवठा करणे हे जल जीवन मिशनचे प्रमुख उद्दिष्ट आहे. जल जीवन मिशनच्या राज्यातील

.../२

# रंगाची वाहतूक करणाऱ्या ट्रकला नागोठण्यात अपघात

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

मुंबई गोवा महामार्गावर नागोठणे पोलीस ठाण्याच्या हद्दीत काही दिवसांपासून अपघाताची मालिका सुरूच असताना मंगळवार दि. १२ एप्रिलला मध्यरात्री १२.३० ते १ वाजण्याच्या सुमारास नागोठणे आंगर आळी समोर मुंबई गोवा महामार्गावर रंगाचे डबे वाहतूक करणाऱ्या ट्रकला अपघात झाला असून यात रंगाचे डबे व ट्रकचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

यासंदर्भात उपलब्ध माहितीनुसार ट्रक चालक माजिद सालिम मकरानी (वय - २६ वर्षे) रा. सुरज कराडी, जि. जामनगर, गुजरात हा रंगाचे डबे भरलेला ट्रक घेऊन माणगाव बाजूकडून वडखळ बाजूकडे जात होता. अतिवेगाने जात असताना मुंबई गोवा महामार्गावर नागोठणे आंगर आळी समोर आला असता चालकाचे ट्रकवरील नियंत्रण सुटल्याने ट्रक साईड पट्टीच्या खाली उतरून आंगर आळीकडे साकवाच्या वरच्या बाजूला पलटी झाला. या अपघातात ट्रक चालक माजिद हा बालंबाल बचावला मात्र ट्रक पलटी झाल्याने यातील रंगाचे डबे बाहेर पडून त्यातून रंग आंगर आळी कडे जाणा-या रस्त्यावर पडले होते. तसेच यात ट्रकचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.या अपघाताची नोंद नागोठणे पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पोलीस निरीक्षक तानाजी नारनवर यांच्या मार्गदर्शनाखाली पो.हे.कॉ. गणेश भोईर हे अधिक तपास करीत आहेत.

# काळ वेळाचे भान हरपून काम करणारे आ.बाळाराम पाटील औरंगाबाद येथे मध्यरात्री घेतली उपोषणकर्त्यांची भेट

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

माजी आमदार स्व. दत्तुशेठ पाटील यांच्या संस्कारात तयार झालेले आणि त्यांचा राजकीय वारसा चालविणारे आमदार बाळाराम पाटील हे एक अजब व्यक्तिमत्त्व असून हाती घेतलेली कामे पूर्ण करताना राऊंड द क्लॉक काम करणारे महाराष्ट्रात अत्यंत दुर्मिळ असे राजकीय नेते असतील !

सोमवारी मध्यरात्री आमदार बाळाराम पाटील व महाराष्ट्र राज्याचे नवयुग क्रांती शिक्षक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष गजानन लक्ष्मण खैरे यांनी औरंगाबाद स्मशानभूमी येथे २ एप्रिल २०२२ पासून शिक्षकांच्या विविध प्रलंबित विषयासंदर्भात बेमुदत उपोषण सुरू केले त्या उपोषणकर्त्यांची भेट घेतली.यावेळी माजी आमदार श्रीकांत देशपांडे सर, माजी आमदार दत्तात्रय सावंत सर उपस्थित होते. त्यांच्या समस्या जाणून घेतल्यानंतर शासन दरबारी त्यांच्या प्रलंबित मागण्या पूर्ण होण्यासाठी



सर्वतोपरी प्रयत्न करू. असे आश्वासन या तिन्ही आमदारांनी त्यांना दिले.

आमदार बाळाराम पाटील यांनी सोमवारी सकाळी पनवेल उरण महाविकास आघाडीच्या वतीने आयोजित महामोर्चाचा आढावा घेतला, त्यानंतर पनवेलच्या शिवसेना मध्यवर्ती कार्यालयात पत्रकारांशी संवाद साधला, महामोर्चाच्या नियोजन समन्वयासंबंधी विविध पक्षांच्या नेत्यांशी समन्वय साधून, कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. महामोर्चाच्या नियोजनात कुठलीही कमतरता राहणार नाही. याची खात्री झाल्यानंतर त्यांनी

.../२

## संक्षिप्त...

### ३ मेपर्यंत राज्य सरकारला राज ठाकरेंचा अल्टिमेटम

**दै.रायगड नगरी । ठाणे**

गुढीपाडवा मेळाव्यानंतर मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनी पुन्हा एकदा मशिदीवरील भोंगे हटवण्याबाबत राज्य सरकारला अल्टिमेटम दिले आहे. ३ मे रोजी रमजान ईद आहे. तत्पूर्वी राज्य सरकारने सर्व मौलवींना बोलावून भोंगे हटवण्याबाबत ठोस निर्णय घ्यावा अन्यथा ३ मेनंतर आम्ही हनुमान चालीसा लावणार म्हणजे लावणारच असा इशारा राज ठाकरेंनी दिला आहे.

राज ठाकरे म्हणाले की, हिंदुत्वाची भूमिका मी आज आणली नाही. पाकिस्तानी कलाकारांना हाकलवून देणारा पक्ष कोणता होता? मुंब्र्यातून अतिरेकी सापडले, वस्तरा कसा सापडेल, दाढीच करत नाही. आझाद मैदानावर रझा अकादमीनं काय धुडघूस घातला. पत्रकारांच्या गाड्या फोडल्या, महिला पोलिसांचा शारिरीक छळ केला. त्यावर कुणीही काहीही बोलले नाही. त्यावर मनसेना मोर्चा काढला. या मोर्च्यामुळेच पोलीस आयुक्त अरुण पटनायक यांना पदावरून काढण्यात आले. आम्ही भोंग्याची भूमिका कायम मांडली. कुठली दंगल तेढ निर्माण करायचा नाही. पण १२ ते ३ मे महाराष्ट्रातील भोंगे खाली ठरवल्यास आमच्या कडून कोणताही त्रास होणार नाही असं त्यांनी सांगितले.

# कालव्याची प्रचंड दुर्दशा : घाणीचे साम्राज्य वाढल्याने डम्पिंग ग्राऊंडचे आलंय स्वरूप!



**दै.रायगड नगरी । रोहा**

रोहा तालुक्यात मागील काळात लाखोंचा निधी खर्च करून नव्याने निर्मिती करण्यात आलेल्या कालव्याची प्रचंड दुर्दशा झाली असून सद्यस्थितीत या कालव्याला डंपिंग ग्राऊंडचे स्वरूप प्राप्त झाले आहे. प्रचंड प्रमाणात साठलेल्या घाणीला जबाबदार कोण ? असा सवाल उपस्थित होत असून साठलेल्या घाणीमुळे नागरिकांच्या आरोग्य धोक्यात आले आहे.

तालुक्यातिल शेती व शेतक-यांच्या हिताच्या दृष्टीने रायगड पाटबंधारे विभागाकडून कोलाड जवळील डोलवहाल येथील कुंडलिका नदीवर पन्नास वर्षांपूर्वी धरण बांधून पाणी अडविण्यात आले. या धरणाच्या माध्यमातून डावा व उजवा तीर अशी कालव्यांची निर्मिती करून शेतीसाठी मुबलक प्रमाणात पाण्याची व्यवस्था केली गेली. ग्रामीण भागात भातशेती पिकविणा-या शेतकरी वर्गासाठी कालव्याचे पाणी प्राप्त झालेल्याने शेतकरी वर्गाला सुगीचे दिवस आले. कालव्याच्या निर्मितीनंतर किरकोळ दुरूस्ती सोडून इतर दुरूस्तीची मोठी कामे काही झाली नाहीत. उंदीर, घुशी, खेकडे, मुठे, चिंबोरी यांनी ठिकठिकाणी कालवा पोखरल्याने तसेच पावसाळ्यात डोंगर द-यातून वाहत येणा-या पाण्यामुळे कालव्याचे मोठे नुकसान झाल्याने कालव्याची पुनर्बांधणी करणे गरजेचे झाल्याने मागील आठ वर्षापूर्वी ती करण्यात आली.

आठ वर्षांपूर्वी कालव्याची पुर्नबांधणी करण्यात आली. परंतू हे काम दर्जात्मक झाले नाही. बांधकाम मजबूत नसल्याने कालव्याच्या निर्मितीचा हेतू साध्य झाला नाही. कालव्याची पुनर्बांधणी नक्की शेतकऱ्यांसाठी केली गेली की नेते मंडळींसाठी हा प्रश्न विभागातील शेतकरी विचारू लागले. पुनर्बांधणी नंतर काही वर्षांतच कालव्यांची दुरवस्था झाली.

गेली चार-पाच वर्षापासून संबंधित खाते व शेतकरी वर्ग यांच्यामध्ये शेतीकरिता पाण्याबाबत एकवाक्यता न झाल्याने कालव्यातून शेतीसाठीचे पाणी बंद झाल्यासारखे झाले आहे. गावातील केरकचरा,मोठ्या प्रमाणावर वाढलेली झाडी झुडपे, पावसाच्या

.../२

# पेण खारेपाट विभागाचा पाणी प्रश्न लवकरच सुटणार : ना.जयंत पाटील

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्यातील खारेपाट विभागातील अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर असून तो सोडविण्याकरिता राज्यशासन कटिबद्ध आहे. रायगडचे खासदार सुनील तटकरे, पालकमंत्री आदिती तटकरे यांच्या माध्यमातून सदरचा पाण्याचा प्रश्न लवकरात लवकर सोडविण्याची कारवाई सुरू आहे, अशी माहिती राज्याचे जलसंपदा मंत्री व राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी पेण येथे आयोजित राष्ट्रवादी परिवार संवादात दिली.



पेण पाली विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादीचा आमदार निश्चितच होईल याची खात्री आहे. त्या करिता बुथ पातळीवरून पक्षाची अभेद्य बांधणी करा. खासदार सुनील तटकरे, पालकमंत्री आदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे यांच्या माध्यमातून रायगड मध्ये राष्ट्रवादी पक्षाची ताकद अधिकच बळकट झाली आहे, असेही प्रतिपादन जयंत पाटील यांनी यावेळी केले.

ते पुढे म्हणाले की, मोदी सरकार दिवसेंदिवस पेट्रोल डिझेल व जीवनावश्यक वस्तुंची दरवाढ करीत आहेत. त्याची झळ सामान्य नागरिकांना बसत आहे. इंधन व जीवनावश्यक वस्तूं सोबतच लोखंड व सिमेंटचीही दरवाढ झाल्याने सामान्य नागरिकांचे घराचे स्वप्न भंगले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी जनसामान्यांना मोदी

.../२

# इको कार चोरी करणारी सराईत गुन्हेगारांची टोळी अटक



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल, कामोठे, खारघर, रबाळे, कोपरखैरणे, परिसरातून सन २०२१ मध्ये मारुती इको कार चोरीस गेल्या होत्या. तसेच मुंबई आयुक्तालय व ठाणे आयुक्तालय हद्दीतून देखील मारुती इको कार चोरीस गेल्या होत्या. सदर गाड्या गुन्हे शाखा कक्ष १ ने आरोपिंसह हस्तगत केल्या आहेत. तमिळनाडू राज्यातून एकुण ५४,००,०००/-रू किमंतीच्या ०९ मारुती सुझुकी इको कार हस्तगत करून एकूण १२ गुन्हयांची करण्यात आली आहे.

नवी मुंबई गुन्हे शाखा, कक्ष-१ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल शिंदे, पोना शशीकांत जगदाळे, पोना निलेश किंद्रे, पोशि आशिष जाधव व पोशि विशाल सावरकर या पथकाने नमूद गुन्हयाचे घटनास्थळ परिसरातील सीसीटीव्ही फुटेज पाहण्यास सुरुवात करून, नमूद गुन्हयातील मारुती इको कार ही रबाळे दिवागाव सर्कल, ऐरोली टोल नाका, पुढे ईस्टर्न एक्सप्रेस हायवेने भांडूप, विक्रोळी, घाटकोपर, कामराजनगर, सांताकुझ, चेंबूर जोडरस्ता, कुर्ला, बिकेसी एमटीएनएल अशी गेल्याची उपलब्ध खाजगी व सरकारी साधन सामुग्रीच्या साहायाने निष्पन्न करून, पुढे सदरची चोरीची कार ही पुन्हा वाशी टोल नाका या ठिकाणाहून गेल्याने वपोनि शिंदे यांनी नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांचेकडून मिळालेल्या तांत्रिक माहितीनुसार एका आरोपीचा संपर्क क्रमांक प्राप्त करून त्याचे तांत्रिक विश्लेषण करून, आरोपींनी एकमेकांशी केलेले आर्थिक व्यवहार व सर्व आरोपीतांचे संपर्क क्रमांक यावरून नमूद गुन्हयात चार आरोपी असल्याचे

.../२

# गड चिरोलीतील डॅशींग कमांडो संजय गिरी पनवेल शहर पोलीस ठाण्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पोलीस सेवेत अनेक वेळा चर्चेत असणारा नक्षलवादी भाग हा गडचिरोली. या भागात बहुतांश पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची एकदा तरी वर्णी या भागात काम करण्याकरिता लागली जाते. तेथील नक्षली भाग, घनदाट जंगल परीसर कधी काय होईल याची शाश्वती नसणारा, अचानक मृत्यू समोर कधी ठाकेल हे कोणीही सांगु शकणार नाही आणि अशा परिस्थितीवर मात करून अनेक पोलीस अधिकारी व कर्मचारी आपल्या जीवाची बाजी लाऊन कोसो दुरू राहुन कर्तव्यदक्षपणे डोळ्यात तेल घालुन आपली सेवा चोखपणे पोलीस आजही बजावित आहेत.

नुकतेच एक पिळदार शरीरयष्टी असलेले पोलीस उपनिरिक्षक संजय गिरी पनवेल शहर पोलीस ठाण्यात त्यांची नियुक्ती झाली त्यांना पाहिले की जरा अनेक जणांना नकळत हेवाच वाटतो व नकळतच तरूणाईच्या तोंडुन सिंगम असा सुर येतो.

या उमद्या व्यक्तीमत्वाचे गडचिरोली काही किस्से त्यांना दैनिक रायगड नगरीशी कथन केले.

गिरी हे मुळचे मालेगाव तालुका अर्धापुर नांदेड जिल्ह्यातील, आतापर्यंत ते नांदेड, गडचिरोली येथे सेवेत होते. २०१८ ते २०२१ पर्यंत त्यांनी त्या ठिकाणी काम केले आहे. गडचिरोली जिल्ह्यात सी–६० मध्ये ते कमांडो म्हणुन कार्यरत होते. अनेक वेळा नक्षल सोबत चकमक झाली होती असे संजय गिरी यांनी अनुभवातुन कथन केले.






नक्षल परीसरात खुप संधी आहे काम करण्यासाठी, तेथील गरीब जनतेसोबत काम करण्याचा खुप छान अनुभवही त्यांनी सांगितला. तेथील आदीवासी लोक खुप प्रेमळ व कष्ट करणारे आहेत असे गिरी म्हणाले आम्ही त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सरकारच्या चांगल्या योजना त्यांचे पर्यंत पोहचविण्याचे त्याचबरोबर त्यांचे प्रभोदन करून खुप काम केले. होम टाऊन नांदेड ठिकाणी गिरी सेवेत असताना तेथील पोलीस अधिक्षक शैलेश बलकवडे तसेच अंकीत गोयल यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी आपल्या शिस्तप्रीय कामाची चुणुक दाखवायला सुरुवात केली. ३० जवानांची एक तुकडी असते असे गिरी यांनी सांगितले. संशयास्पद चाहुल लागताच कामगिरी वर निघताना नक्षलवादी यांनी येण्या जाण्याच्या रस्त्यावर काही घातक भु सुरुंग तर पेरले नाहीत ना? याची शहानिशा करण्याकरीता आमची टिम सदैव सतर्क असते व त्याकरीता सुक्ष्म चेकींग कटाक्षाने करूनच पुढचे पाऊल आम्ही टाकत असतो. कधी काय होईल याची पुसटशी कल्पनाही कुणालाही नसते म्हणुन सर्व टिम ॲक्शन मोड वर असते असे संजय गिरी अनुभवातुनच सांगतात. संजय गिरी यांचे चुलते प्रभाकर गीरी हे पोलीस निरीक्षक परभणी जिल्ह्यात कार्यारत होते. जनतेच्या अडी अडचणी सोडवुन भयमुक्त प्रशासन देण्यात आमचे चुलते यांनी पोलीस सेवेत उत्कृष्ट काम केले ते आता सेवानिवृत्त झाले आहेत. खरी तर मला त्यांच्या कडूनच पोलीस सेवेत येण्याची प्रेरणा मिळाली. माझे शिक्षण बी.एस.सी ॲग्रीकल्चर वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी या ठिकाणी झाले व आज मला पनवेल शहर पोलीस ठाण्यात वरीष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने एक अनुभवी पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली काम करण्यासाची संधी मिळाली आहे. जनसेवा हिच ईश्वरी सेवा हे ब्रीद उराशी बाळगून मी आज येथे काम करीत आहे असे पोलीस उपनिरिक्षक संजय गिरी यांनी शेवटी सांगितले.

# माथेरानच्या प्रशासक सुरेखा भणगे यांना उत्कृष्ट प्रशासक पुरस्काराने सन्मानित

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान नगरपरिषदेच्या प्रशासक तथा मुख्याधिकारी पदाची जबाबदारी स्वीकारण्यापूर्वी सुरेखा भणगे यांनी खालापूर नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी पदाची सुत्रे हाती घेतली होती त्यावेळी त्याठिकाणी त्यांनी कोरोना महामारी, चक्रीवादळ अशा संकट काळात प्रशासक म्हणून भक्कमपणे कामगिरी करीत सर्वसामान्य लोकांसाठी मदतकार्य केले होते.आदिवासी वाड्या–वस्त्यांवर समक्ष भेटी देऊन अनेक शाश्वत विकासकामे पूर्ण केलीत, कोरोना महामारीत बाधितांना उपचार मिळवून देण्यासाठी मोलाचे सहकार्य केले, मध्यरात्रीच्या वेळी स्मशानात उभी राहून अत्यंविधीसाठी सुध्दा जातीने लक्ष देऊन मदतकार्य केले होते. अशा रणरागिनी प्रशासक तथा एक कार्यतत्पर मुख्याधिकारी सुरेखा भणगे –शिंदे यांच्या कामाची दखल घेत स्टार महाराष्ट्र संस्थेकडून उत्कृष्ट प्रशासक पुरस्काराने त्यांना दि.९ एप्रिल रोजी सन्मानित करण्यात आले आहे.



खालापूर नगरपंचायत मुंबई, पुणे, नवी मुंबई महानगराच्या हाकेच्या अंतरावर आहे. नगरपंचायतीत आदिवासी बांधवांची लोकसंख्या ५० टक्के असून आजही वाड्यावस्त्यांवर लोक राहतात येथील आदिवासी बांधवाचा शैक्षणिक,सामाजिक विकास व्हावा यासाठी आदिवासी सुसज्ज आदिवासी भवन उभारले,अनुसुचित जातीच्या लोकांसाठी रमाबाई घरकुल आवास योजने अंतर्गत जिल्ह्यामधून सर्वाधिक प्रस्ताव समाजकल्याण विभागाकडे पाठवत मा.जिल्हाधिकारी यांनी मंजूर केली आहेत.कोरोना विषाणूने शिरकाव करताच देशात टाळेबंदी होताच पहिल्याच आठवड्यात गरीब गरजू कुटूंब तहसिल कार्यालय,सीआरएस फंड व लोकांच्या सहकार्यातून एक महिन्याचे किराणा व धान्य उपलब्ध करून सहकार्य केले.राज्यात वाढती रूग्णसंख्या पाहता एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यात खासगी डॉक्टर्स आणि नगरपंचायतीच्या मार्फत घरोघरी जावून आरोग्य तपासणी केली आणि तीच संकल्पना मुख्यमंत्री महोदय यांनी सुध्दा राज्यात सुरू केली आहे,खालापूर नगरपंचायत हद्दीत तहसिल कार्यालयसह सर्व शासकीय कार्यालये असल्याने दर आठवड्याला पेट्रोल पंप, भाजी विक्रेते यांची आरोग्य तपासणी केली,कोरोना महामारी विषयी नियम व जनजागृतीसाठी भिंतीवर व रस्त्यावर श्लोगन लिहिले या संकल्पनेची जिल्हाधिकारी यांनी स्वतः पाहणी करून कौतुक केले, टाळेबंदी काळात अडकलेल्या अनेक परप्रांतीयांची राहण्याची सोय करून उत्तम व्यवस्था करीत त्यांना त्यांच्या मूळगावी घरी सोडण्यासाठी सहकार्य केले, कोरोना बाधीत रूग्णांवर उपचारासाठी खालापूर येथे सुरू केलेल्या सीसी सेंटर उभारणीसाठी मोलाचे सहकार्य केले.

बहुसंख्य आदिवासी बांधवांसाठी पक्के घरे बांधून प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडून केला असून प्रकल्प अधिकारी यांनी पहाणी केली असता कामाला कामाला गती मिळाली, खोपोली नगरपालिकेच्या प्रभारी मुख्याधिकारी म्हणून जिल्हाधिकारी यांनी जबाबदारी दिल्यावर शहरात गर्दीच्या ठिकाणी मास्क वापरणे, सामाजिक अंतर ठेवणे यासाठी बाजारपेठेत, भाजी मंडई, मासळी मार्केट याठिकाणी कारवाई करीत जनजागृती केली, आरोग्य आपल्या दारी ही संकल्पना खासगी डॉक्टर्स, शिक्षक आणि पालिका कर्मचारी यांच्या सहकार्यातून खोपोली शहरात राबवून घरोघरी जावून तपासणी करीत मोफत औषधांचे वाटप केले, पालिकेच्या सीसी सेंटरमध्ये दररोज भेट देवून रूग्णांची भेट घेवून मिळणारा सेवेची चौकशी केली, तसेच एक तरूण महिला मुख्याधिकारी असतानाही रात्रीचे २ वाजता स्मशानभूमी स्वतः उपस्थित राहत अत्यंविधीची व्यवस्था केली.सहा महिन्यांपूर्वी भणगे यांची माथेरान नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी पदाची धुरा हाती घेतल्यावर माथेरानचा चेहरामोहरा बदलून अनेक कायदेशीर प्रकरणे हाताळत आहेत.सभागृहातील सदस्यांचा कार्यकाळ संपुष्टात आल्यानंतर त्यांच्या खांद्यावर प्रशासकाची महत्वपुर्ण जबाबदारी देण्यात आली आहे. होतकरू, निश्वार्थी रणरागिणी मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांच्या कार्याची दखल घेत स्टार महाराष्ट्राचे जनार्दन शिंदे यांनी घेत सन –२० – २१ पुरस्कार जाहिर केला होता.कोरोनामुळे कार्यक्रम स्थगित ठेवण्यात आलेला मात्र कोरोनाचे नियम उठवताच शनिवार दि.१० एप्रिल रोजी पनवेल येथे वासुदेव बळवंत फडके सभागृहात आयोजित कार्यक्रम मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांना उत्कृष्ट प्रशासक पुरस्काराने सन्मानित केले आहे.भणगे यांना पुरस्कार प्रदान करताच कर्जत–खालापूर तालुक्यातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

> खालापूर नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी पदी पदभार घेताच कोरोना माहामारीने थैमान घातले,नगरपंचायत हाद्दीत कोरोनाचे संक्रमण रोखण्यासाठी आणि कोविड सेंटर उभारण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि नागरिकांना मदत केले,शासकीय योजना राबविण्यासाठी तात्कालीन जिल्हाधिकारी निधी चौधरी यांचे मोठे सहकार्य मिळाले असून सध्या माथेरान नगरपरिषदेत काम करीत असताना जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांचे सहकार्य मिळत असल्यामुळे निश्वार्थीपणे शाश्वत कामे करण्यासाठी उर्जा मिळत आहे.
>
> **सुरेखा भणगे -शिंदे, प्रशासक तथा मुख्याधिकारी, माथेरान नगरपरिषद**

# बळवलीच्या अजय पाटीलचा विश्वविक्रम

## एका तासात केले १७०० जोर सुर्यनमस्कार

**दै.रायगड नगरी । पेण**

रायगड जिल्ह्यातील आयोध्या म्हणून ओळख असलेल्या पेण तालुक्यातील बळवली गावचा सुपुत्र अजय कमलाकर पाटील याने विश्वविक्रम केला आहे. मुंबई येथे झालेल्या कार्यक्रमात एका तासात १७०० जोर सूर्यनमस्कार काढून IE-Book of World Record जागतीक विश्वविक्रम करून बळवली गावाचे नाव देश पातळीवर मोठं केलं आहे.

अजय पाटील याने या अगोदर हनुमान व्यायाम शाळा पेण येथे ५ तासात ५५५५ जोर सूर्यनमस्कार काढून रेकॉर्ड बनवला होता. यासाठी तो गेली १२ वर्ष मेहनत करीत आहे.

यावेळी अजय पाटील IE- Book of World Record साठी एक तासात १५०० जोर सूर्यनमस्कारचा टार्गेट देण्यात आला होता, मात्र अजय पाटीलने एक तासात १७०० जोर सूर्यनमस्कार पूर्ण करून हा विश्वविक्रम केला. यावेळी पद्मश्री शिवानंद स्वामी यांच्या हस्ते अजय पाटीलचा सन्मान करण्यात आला. सदर रेकॉर्ड वेळी देश विदेशातून मान्यवर व कलाकार उपस्थित होते.

केंद्रीय मंत्री रामदास आठवले, अलिबागचे आमदार महेंद्र दळवी, पेणचे आमदार रवींद्र पाटील, माजी सरपंच रमेश पाटील, नरेंद्र ठाकूर, हभप अमित महाराज, नंदेश पाटील, डॉ.अशोक भोईर, विश्व हिंदू परिषदेचे भूपतराव आदींनी विक्रमविर अजय पाटीलचे गौरव केले आहे. एका तास १७०० जोर सूर्यनमस्कार काढून विश्वविक्रम केल्याने सर्व स्तरातून अजय पाटीलवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. बळवली ग्रामस्थांनी फटाक्यांच्या आतषबाजीत अजयची संपूर्ण गावातून वाजतगाजत मिरवणूक काढली.



पृष्ठ क्र.१ वरुन...

## प्रत्येक घरी नळाने पाणी योजनेचे काम वेगाने पूर्ण करावे : मुख्यमंत्री

अंमलबजावणीकरीता राज्यस्तरावर राज्य पाणी व स्वच्छता मिशन, जिल्हास्तर पाणी व स्वच्छता मिशन कार्यान्वयन यंत्रणा आहे. ग्राम पातळीवर जल जीवन मिशन अंतर्गत कार्यक्रमाचे नियोजन, अंमलबजावणी व देखभाल दुरुस्ती यंत्रणा म्हणून ग्रामीण पाणी व स्वच्छता समिती काम करते. राज्यातील १,४६,०८,५३२ ग्रामीण कुटुंबांपैकी १,०३,५२.५७८ (७१ टक्के) ग्रामीण कुटुंबाकडे वैयक्तिक नळ जोडणी उपलब्ध करण्यात आली असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

## आ.बाळाराम पाटील औरंगाबाद येथे मध्यरात्री घेतली उपोषणकर्त्यांची भेट

मध्यरात्री थेट औरंगाबाद गाठले. आमदार बाळाराम पाटील यांच्या कार्यकुशलतेचा धडाका एव्हाना पाच जिल्ह्यातील जनतेला ठाऊक झाला आहे. काळवेळ, भान हरपून जनतेच्या समस्या निवारण करत सातत्याने कार्यरत असणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचे कौतुक होत आहे.

## घाणीचे साम्राज्य वाढल्याने डम्पिंग ग्राऊंडचे आलंय स्वरूप!

पाण्याबरोबर वाहत आलेले दगड गोटे, तसेच काही गावातील गटारांचे वाहत आलेले सांडपाणी व त्यामुळे पसरलेली दुर्गंधी यामुळे कालव्याच्या दुर्दशेत मोठी वाढ झाली आहे. सद्यस्थितीत तर कालव्याला पाणी नसल्याने कालवा असून नसल्या सारखाच झाला आहे. कालव्यात साठलेली घाण पाहता कालव्याला जणू काही डंपिंग ग्राऊण्डचेच स्वरूप आल्यासारखे चित्र आहे.

## पेण खारेपाट विभागाचा पाणी प्रश्न लवकरच सुटणार : ना.जयंत पाटील

सरकार महागाई रोखण्यात अपयशी ठरली आहे त्याची जाणीव करून देणे गरजेचे आहे. बुथ कमिटीचे अध्यक्ष व सदस्यांनी घरोघरी जाऊन ग्रामस्थांच्या समस्या सोडविण्याकरिता प्रयत्न करावे. त्याचप्रमाणे मोदी सरकार करत असलेली दरवाढी बद्दलही त्यांना जागरूक करावे. राज्य सरकारच्या विविध लोकोपयोगी योजनांच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा विकास साधून घरोघरी विकास गंगा पोचवण्याचे काम राष्ट्रवादीच्या माध्यमातून करा असे आवाहन यावेळी जयंत पाटील यांनी केले. खासदार सुनील तटकरे यांनी केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून रायगडात विकासगंगा आणले आहे पालकमंत्री आदिती तटकरे यांनी विशेष प्रयत्न करून आदिवासीं करिता ६०० कोटींचा प्रकल्प आणला आहे रायगड चे पालकमंत्री म्हणून आदिती तटकरे यांनी मोठ्या प्रमाणावर विकास कामे केली असून त्यांच्या कार्याचा आलेख पाहता त्यांना कॅबिनेट मंत्रीपदाची संधी मिळू शकते. याप्रसंगी खासदार सुनील तटकरे म्हणाले की, आगामी निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी पक्ष नंबर १ वर राहील. मुंबई–गोवा महामार्गाच्या कॉंक्रिटीकरण करण्याकरिता आपण विशेष प्रयत्न केले व त्याची फलश्रुती म्हणूनच केंद्रीय रस्ते विकास मंत्री गडकर्यांनी याकामी कोट्यवधींचा निधी दिला आहे, या कामाचे भुमिपुजनही झाले आहे. या कार्यक्रमाला राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार सुनील तटकरे, पालकमंत्री आदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे, महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, राष्ट्रवादी ओबीसी सेलचे उपाध्यक्ष यशवंत घासे, मेहबुब शेख, युवक अध्यक्ष नरेद्र ठाकुर, तालुकाध्यक्ष दयानंद भगत, शहर अध्यक्ष जितेंद्र ठाकूर, विशाल बाफना, संतोष अडसुळे, गंगाधर पाटील, तालुका युवक अध्यक्ष विकास पाटील, महिला आघाडीच्या चैताली पाटील, हबीब खोत, राजेश वर्तक, झेन नाईक, यांच्यासह राष्ट्रवादीचे पदाधिकारी व कार्यकर्ते शेकडोंच्या संख्येने उपस्थित होते.

## इको कार चोरी करणारी सराईत गुन्हेगारांची टोळी अटक

निष्पन्न करून त्यापैकी एक ओला कॅब चालक असल्याचे निष्पन्न करून मुंबई मेट्रोपॉलीटन परिसरातून १२ मारुती इको कार चोरल्याचे प्रथमदर्शनी निष्पन्न केले. त्यानंतर गुन्हयातील पाहीजे आरोपी यांना पकडण्यासाठी दोन पथके वपोनि. सुनिल शिंदे, सपोनि. हर्षल कदम व पथक तसेच सपोनि. निलेश पाटील, सपोनि. आर. एम. तडवी व पथक अशी तयार करून तपास केला. यातील पथक क्र. १ यांनी आरोपी नामे उस्मान सय्यद व शहानवाज शेख यांना सतत पाच ते सहा दिवस अहोरात्र परिश्रम करून कुर्ला व पनवेल परिसरातून शिताफीने अटक केली. तसेच पथक क्र. २ यांनी तीन ते चार दिवस अहोरात्र आरोपी अब्दुल सलाम शेख यास जरीमरी झोपडपटटी, कुर्ला परिसरातून अटक केली आहे. नमूद आरोपी अटक केल्यानंतर तीनही अटक आरोपी यांची १४ दिवस पोलीस कस्टडी रिमांड घेवून यातील अटक आरोपी उस्मान सय्यद याचेसह वपोनि, सुनिल शिंदे, सपोनिक पोहा विश्वास पवार, पोना शशीकांत जगदाळे, पोना निलेश किंद्रे, पोशि आशिष जाधव, पोशि विशाल सावरकर या पथकाने तामिळनाडू राज्यामध्ये जावून खाजगी तामिळ दुभाषिक (ट्रान्सलेटर) चेन्नई, कोइंबतूर, वेल्लोर, सेलम, त्रिची, तुतीकोरीन, तिरुचिरापल्ली व मदुराई या भागात सतत १० दिवस तपास करून आरोपी यांनी चोरी केलेल्या एकुण ०९ मारुती इको कार हस्तगत करून नवी मुंबई आयुक्तालय ०४, मुंबई आयुक्तालय ०६ व ठाणे शहर आयुक्तालय ०२ असे एकूण १२ गुन्हे उघडकीस आणले आहेत.


( जलसंपदाविभाग, शासननिर्णय, क्रमांक, निविदा-०४१७/प्र.क्र. २४७/ मोप्र-१/ दि:-३०/११/२०१८ )

महाराष्ट्र शासन

### निविदा सूचना

महाराष्ट्र शासन

कार्यकारी अभियंता, हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली, ता. पेण, जि. रायगड, पिन नं-४०२१०७ यांचे कार्यालय

ईमेलपत्ता :- eehmpd@rediffmail.comeehmpd2021@gmail.com, दूरध्वनी -०२१४३-२७८०११

### ई निविदा सूचना क्र. ०१ सन २०२२-२३

कार्यकारी अभियंता, हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली, ता. पेण, जि. रायगड, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणीकृत व सक्षम अभियंता या कंत्राटदारांकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील ई प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाउनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली, ता. पेण, जि. रायगड यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| कामाचे नाव | अंदाजित किमत रुपये | को-या निविदा संचाची किंमत | इसारा रक्कम रुपये | कंत्राटदा राच्या नोंदणीची वर्गवारी | काम पूर्ण करण्याचा कालावधी | निविदा संच उपलब्ध कालावधी | निविदा संच भरुन सादर करणे | निविदा उघडणे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पन्हाळघर प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात बंदिस्त नलिका वितरण प्रणालीचे सर्वेक्षण, संकल्पन इ. कामे करणे. | ४,०१,७१९ | २३६०/- | ५०००/- | वर्ग ८ व वरील | ६ महिने (पावसाळ्यासह) | दिनांक : १५/४/२०२२ ते २९/४/२०२२ (१५.००) | दिनांक : १५/४/२०२२ ते २९/४/२०२२ (१६.००) | दिनांक : ०३/०५/२०२२ |
| हेटवणे प्रकल्प उपविभाग क्र.४ व ५ चे विद्युतीकरणाचे काम. - हेटवणे वसाहत, कामार्ली ता.पेण जि.रायगड | २,९६,८१२ | २३६०/- | ३०००/- | वर्ग ९ व वरील | ६ महिने (पावसाळ्यासह) | दिनांक : १५/४/२०२२ ते २३/४/२०२२ (१५.००) | दिनांक : १५/४/२०२२ ते २३/४/२०२२ (१६.००) | दिनांक : २५/०४/२०२२ |
| हेटवणे प्रकल्प उपविभाग क्र.४ व ५ करीता प्रसाधन गृह दुरुस्तीचे काम. -हेटवणे वसाहत, कामार्ली ता.पेण जि.रायगड | २,६५,२४६ | २३६०/- | ३०००/- | वर्ग ९ व वरील | ६ महिने (पावसाळ्यासह) | दिनांक : १५/४/२०२२ ते २३/४/२०२२ (१५.००) | दिनांक : १५/४/२०२२ ते २३/४/२०२२ (१६.००) | दिनांक : २५/०४/२०२२ |

खालील ठिकाणी ई- निविदा बाबत सर्व माहीती उपलब्ध आहे.

१) संकेतस्थळ http://mahatenders.gov.in

(सदर निविदेसुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.)

२) कार्यकारी अभियंता, हेटवणेमध्यमप्रकल्पविभाग,कामार्ली-पेण कार्यालयातील सूचना फलक.

जा.क्र.हेमप्रवि/ लेशा-१/निविदा/ ७०६ /२०२२,
का.अभियंता हे.म.प्र. कामार्ली,ता. पेण, जि. रायगड,
दिनांक :- ०७/०४/२०२२

कार्यकारी अभियंता,
हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग,कामार्ली,
ता.पेण जि.रायगड

क्र.जिमाका/रायगड/जाहिरात/०७/५८०/२०२२


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## माणगांवात महिलांसाठी योग प्रशिक्षण शिबिर २२ महिलांनी घेतले योगाचे धडे

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

महिला पतंजली योगपीठ माणगांवच्या वतीने आयोजित निशुल्क योग व प्राणायाम शिबिराचा समारोप सोमवार दि.११ एप्रिल रोजी आदर्श विद्यामंदिर प्राथमिक शाळा उतेखोल माणगांव येथे संपन्न झाला. दि. ८ ते ११ एप्रिल असे चार दिवसीय शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरात रोज सायं. ५.०० ते ६.३० सलग चार दिवस योग, प्राणायाम, अनुलोम-विलोमचे प्रशिक्षण देण्यात आले.

माणगांव मधील २२ महिलांनी उत्स्फूर्त पणे शिबिरात सहभाग घेतला. गतिमान जीवनात आरोग्या बाबत विशेष जागरूकता,आहार-विहार व योगाचा अभ्यास करून जीवन स्वस्थ व तंदुरुस्त करण्यास योग शिबिरात प्रशिक्षण देण्यात आले.

महिला पतंजली योग पिठाच्या मार्गदर्शक योग शिक्षिका तथा दक्षिण रायगड महिला पतंजली समिती अध्यक्षा वैशाली जंगम, सहयोगी मार्गदर्शक शिक्षक अपूर्वा अमोल जंगम, सुवर्णा तवटे, कविता जंगम यांनी शिबिरात योग, प्राणायाम, लोन अनुलोम याविषयी मार्गदर्शन केले. या चार दिवसीय शिबिराचा समारोप महिला पतंजली योग पिठाचे मान्यवर मार्गदर्शक, योग शिक्षक व प्रशिक्षणार्थी महिला यांच्यासह संपन्न झाला.



# भरडखोल येथे संत निरंकारी पद्धतीने विवाह सोहळा

**दै.रायगड नगरी । शिस्ते**

तालुक्यातील भरडखोल येथे संत निरंकारी पद्धतीने विवाह सोहळा संपन्न झाला. रविवारी (ता. १०) रोजी दुपारी झालेल्या या कार्यक्रमात संत निरंकारी मराठी मासिक पत्रिकेचे संपादक चंद्रकांत जाधव यांच्या उपस्थितीत उपस्थितीत अत्यंत साध्या पद्धतीने हा सोहळा पार पडला.

भरडखोल मधील संदीप किल्लेकर यांची कन्या मृदुला व पनवेल येथील महादेव अडसूळ यांचा मुलगा सिद्धेश यांचा विवाह होता. झोनल इंचार्ज म. प्रकाश म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत साध्या पण प्रभावशाली पद्धतीने आयोजित केलेल्या या विवाह सोहळ्याचा प्रारंभ निरंकारी मिशनच्या पारंपारिक 'जयमाला' (पुष्पहार) आणि जोडप्याच्या गळयात 'सामायिक हार' (सांझाहार) घालून करण्यात आला, त्यानंतर सुमधूर संगीताच्या चालीवर पवित्र मंत्राच्या रुपात असलेल्या चार 'निरंकारी लांवां' (मंगलाष्टके) चे गायन करण्यात आले. प्रत्येक लांवांच्या शेवटी सद्गुरु स्वरूप महात्मा व उपस्थित भाविक-भक्तगणांकडून वधू-वरांवर पुष्पवर्षाव करण्यात आला. कोणत्याही प्रकारची विद्युत रो-षणाई, फटाके तसेच वाजंत्री असं अनावश्यक खर्च पाहायला मिळाला नाही. यावेळी स्टेजविराजमान महात्मा जाधव यांनी सांगितले की, संत निरंकारी पद्धतीने विवाह सोहळ्यात विधी केल्या जात नाहीत तर संस्कार दिले जातात. गृहस्थाश्रमात प्रवेश करत असताना जबाबदारीची जाणिव करून देतात. १९७३ साली सालापासून मिशनच्या माध्यमातून साध्या पद्धतीने विवाह सोहळयास सुरवात झाली. कोणत्याही पद्धतीचे अवडंबर न ठेवता संत निरंकारी मिशनच्या माध्यमातून वार्षिक संत समागमामध्ये मोठ्या प्रमाणावर सामुहीक विवाह सोहळे संपन्न झाले आहेत. लग्न सोहळ्याचे निमित्त साधुन आत्म्याला परमात्म्याची ओळख करून मानवी जीवनाची ईती कर्तव्ये पार पडण्याची संधी या माध्यमातून प्राप्त होत असते असे यावेळी सांगितले. संत निरंकारी मंडळ साध्या विवाहपद्धत तसेच वृक्षारोपण, आरोग्य शिबीर व स्वच्छता अभियान असे अनेक सामाजिक उपक्रम राबवते असे यावेळी सांगितले.



या विवाह सोहळ्यासाठी मुंबई, पुणे, अलिबाग, पेण व पनवेल येथून संत महात्मे व आप्तेष्ट उपस्थित होते. क्षेत्रीय संचालक प्रवीण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सेवादल मंडळींनी यावेळी उत्तम सेवा केली. बारामती येथून आलेले गायकवाड गुरुजी यांनी सूत्रसंचालन केले तसेच संत निरंकारी मंडळ रायगड झोनचे क्षेत्रीय प्रबंधक महात्मा प्रकाश म्हात्रे यांनी आभारप्रदर्शन केले.

# डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त निबंध व वक्तृत्व स्पर्धा संपन्न

**दै.रायगड नगरी । कर्जत**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त फुले शाहू आंबेडकर विचारमंच नाना मास्तर नगर मुद्रे खुर्द यांनी शालेय विद्यार्थ्यांसाठी निबंध व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले होते.



कर्जत मधील राजिप च्या जीवन शिक्षण मंदिर शाळेत स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर इयत्ता ५ वी ते सातवीच्या विद्यार्थ्यासाठी ग्रंथप्रेमी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि ८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यासाठी राष्ट्रकार्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान हे विषय निबंध व वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धेत कर्जत शहर व कर्जत शेजारील गावातील खाजगी व जिल्हा परिषदेच्या शाळेतील बहुसंख्य विद्यार्थ्यानी सहभाग नोंदवला. स्पर्धेचे उद्धाटन सुमंतु हॉस्पिटलचे डॉ. सुनील ढवळे यांच्या हस्ते करण्यात आले होते, विजेत्या स्पर्धकांना जयंती निमित्त रॉयल गार्डन येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात बक्षीस वितरण केले जाणार आहे. तर कार्यक्रमाला फुले शाहू आंबेडकर विचारमंच चे जेष्ठ सल्लागार रमेश खैरे व ॲड. तुकाराम ढोले, फुले शाहू आंबेडकर विचारमंच चे कार्याध्यक्ष विजय जगताप, शिक्षक संघाचे तालुका अध्यक्ष मनोहर भोसले. सामाजिक कार्यकर्ते हरिश्चंद्र जाधव, अमोल रोकडे, शुभम अष्टेकर, सिद्धार्थ ढोले, अल्पेश मोरे, संजय अष्टेकर आदी पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन मालू गायकवाड यांनी केले तर आभार शिवाजी कावरे यांनी मानले.

# लोन करता घेतलेले पैसे परत न दिल्याने गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

होम लोन करून देण्यासाठी घेतलेले पैसे परत न दिल्या प्रकरणी फसवणूक केल्याचा गुन्हा कळंबोली पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे.

रोडपाली येथील साधना प्रदीप जैस्वाल त्यांची मुलगी आरुषी ही हीमकर रणजीत सिंग यांच्या ऑफिसला गेली. यावेळी लोनसाठी डॉक्युमेंट देण्यात आले. त्यानंतर साठ लाख रुपयांचे होम लोन मिळण्यासाठी त्यांनी २ ते ३ बँकेत प्रपोजल टाकले. त्यासाठी दोन टक्के कमिशन द्यावे लागेल असे सांगण्यात आले. त्यातील अर्धे पैसे आत्ता द्यावे लागतील असे सांगून तीस हजार ९०० रुपये हिमकर सिंग याच्या खात्यात ट्रान्सफर करण्यात आले. एकूण ५६ हजार ६०० रुपये त्यांच्या खात्यात जमा करण्यात आले. मात्र हीमकर यांनी होम लोनचे काम केले नाही. त्यामुळे दिलेले पैसे व डॉक्युमेंट परत मागितले असता वीस हजार रुपये परत करण्यात आले. व ३६ हजार सहाशे रुपये परत न केल्याने हिमकर याच्याविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# प्रवासी वाहतुकीच्या घोड्यांची पासिंग घेण्यासाठी अश्वपाल राकेश कोकळेंचे पोलीस ठाण्यात निवेदन

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरानमधील पर्यटन वाहतूक अश्व परवाना पासिंग करण्याबाबत येथील धनगर समाजाचे अध्यक्ष तथा अश्वपाल राकेश कोकळेंनी सहाय्यक पोलीस निरीक्षक लव्हे यांना निवेदन सादर केले आहे.

माथेरान हे पर्यटन स्थळ असून या ठिकाणी ४६० घोडे पर्यटकांची वाहतूक करीत आहेत यांचे प्रवासी वाहतुकीचे परवाने दरवर्षी पोलीस विभागामार्फत मार्च महिन्यात पास केले जातात. परंतु मार्च महिना निघून गेला तरी चालू वर्षी पासिंग घेतली गेली नाही. त्यामुळे घोडेवाल्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

याकामी जागरुक अश्वपाल राकेश कोकळे यांनी सर्व अश्वपालकांसाठी पोलीस विभागा मार्फत सन २०२१ ते २०२२ या चालू वर्षांची पासिंग लवकरात लवकर घ्यावी या आशयाचे लेखी निवेदन सहाय्यक पोलीस निरीक्षक लव्हे यांना निवेदन सादर केले आहे.




मा.गोडसे सो

अर्जदारातर्फे वकील
ॲड.मिल्का दि. घरत

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.४३३/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.३०/०४/२०२२

श्री.धनाजी बाळा वास्कर वगैरे १ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, मौजे : कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे : कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि.रायगड**

| मौजे | सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| कुंडेवहाळ | १०/५/ब | ०.१०.६० | ०.१५ |

कै.बाळा पोशा वास्कर यांचा दि.१०/०१/२००७ रोजी मु.कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी मयत झाले असून, त्यांची पत्नी म्हणजेच अर्जदार नं.१ व २ यांची आई कै.जीजाबाई पोशा वास्कर ह्या सन २५/०९/१९८७ साली मु.कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी मयत झाली असून त्यांस अर्जदार क्र.१) श्री.धनाजी बाळा वास्कर, २) बामुबाई बाळा वास्कर असे वारसदार आहेत.

अर्जदार यांनी कै.बाळा पोशा वास्कर यांच्या मृत्यूच्या पश्चात वारस दाखला मिळणेसाठी मे.दिवाणी न्यायालयात सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करण्यासंबंधी कोणाही कोणत्याही प्रकारची हरकत, अगर तक्रार असल्यास त्यांनी त्यांच्या वकीलांमार्फत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे.न्यायालयात सादर करावी. विहित मुदतीत हरकत न केल्यास मे.न्यायालय योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करतील. तसेच मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाही.

आज दि.०५/०४/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली आहे.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**



अपर तहसिलदार व शेतजमीन न्यायाधिकरण पनवेल यांचे न्यायालयात
पत्ता : पहिला मजला, कृषी उत्पन्न बाजार समिती बिल्डींग, रायगड बाजार जवळ, मार्केट यार्ड, पनवेल-४१०२०६
३२ ग दावा क्रमांक : टेनन्सी/एसआर/०६-२०२२

**जाहीर नोटीस**

१) श्री.तुकाराम रामा पाटील
वतीने कुलअखत्यारी
क्र.१) श्री.अनंता तुकाराम पाटील
क्र.२) श्री.ज्ञानेश्वर तुकाराम पाटील
सर्व रा.वलप, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
१) श्री.सुनिता रघुनाथ केलकर
२) श्रीमती.मिना मधुकर केळकर
३) श्रीमती.वैशाली विनायक फारक
४) श्रीमती.सारिका कुमार अभ्यंकर
५) श्रीमती.श्रद्धा श्रीकांत वैशपायन
६) श्रीमती.अनुराधा अरुण टिळू
७) श्रीमती.ज्योती नागेश देशपांडे
सर्व रा.हाऊस नं.६०५/अ, सिद्धीविनायक को.ऑप.हौ.सो.,
टिळक रोड, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाले/जमीनमालक

**जमिनीचे वर्णन**

| तालुक्याचे नाव | गावाचे नाव | भूमापन क्र. (सर्व्हे नं.) | पोट हिस्सा क्रमांक | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| पनवेल | हेदुटणे | ४ | ८ | ०-०५-०<br>०-०२-० पोख | ०.०८ |

अर्जदार यांनी अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण, पनवेल यांचे न्यायालयात वरील जमिनीचे जमीन मालक आहेत व महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ चे कलम ३२ ग प्रमाणे खरेदी किंमत होणेकरिता अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण, पनवेल यांच्या न्यायालयात दि.०३/०२/२०२२ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

तरी या दाव्यामध्ये हितसंबंध असलेल्या अर्जदार व सामनेवाले स्वतः किंवा त्यांचे अधिकृत वारस अगर प्रतिनिधी यांनी सुनावणीच्या दिवशी व वेळी आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह या न्यायालयात उपस्थित राहून काही सांगावयाचे असल्यास किंवा तिला हरकत द्यावयाची असल्यास दि.२६/०४/२०२२ रोजी दुपारी १२.०० वाजता ठिकाण पनवेल येथे शेतजमीन न्यायाधिकरणापुढे हजर होण्याविषयी आपणांस (आपल्या विधीतज्ञांमार्फत) न्यायाधिकरण यावरुन फर्मावित आहे. जर नेमलेल्या वेळी व ठिकाणी न्यायाधिकरणापुढे हजर होण्याविषयी आपण (आपल्या विधीतज्ञांमार्फत) कसूर कराल तर त्याबाबतीत आपणांस काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरण्यात येईल आणि आवश्यक त्या चौकशीच्या कामांत गैरहजेरीत सुरूवात करण्यात येईल व प्रकरणाच्या गुणवत्तेनुसार निर्णय दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १२/०४/२०२२

**सही/-**
**अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण पनवेल, रायगड**



मुजावर सो.कोर्ट

वकील : ॲड.तृप्ती राऊत

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब, वरिष्ठ स्तर, यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१९२२/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२५/०४/२०२२

१) श्री.श्रीधर तुकाराम माळगावकर
वय : ७३ वर्षे, व्यवसाय : निवृत्त
रा.फ्लॅट नं.३०४ शिवदर्शन सीएचएस लि.,
प्लॉट नं.ई/६९, सेक्टर ३, बेलपाडा, खारघर,
नवी मुंबई-४१०२१०, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्रीमती.गौरवी गणपत सारपोळे
वय : ४७ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.फ्लॅट नं.३०४ शिवदर्शन सीएचएस लि.,
प्लॉट नं.ई/६९, सेक्टर ३, बेलपाडा, खारघर,
नवी मुंबई-४१०२१०, ता.पनवेल, जि.रायगड
३) श्री.सुरेश श्रीधर माळगावकर
वय : ४४ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.फ्लॅट नं.३०४ शिवदर्शन सीएचएस लि.,
प्लॉट नं.ई/६९, सेक्टर ३, बेलपाडा, खारघर,
नवी मुंबई-४१०२१०, ता.पनवेल, जि.रायगड
४) श्री.मनोज श्रीधर माळगावकर
वय : ४१ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.फ्लॅट नं.३०४ शिवदर्शन सीएचएस लि.,
प्लॉट नं.ई/६९, सेक्टर ३, बेलपाडा, खारघर,
नवी मुंबई-४१०२१०, ता.पनवेल, जि.रायगड
५) श्री.संतोष श्रीधर माळगावकर
वय : ३८ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.फ्लॅट नं.३०४ शिवदर्शन सीएचएस लि.,
प्लॉट नं.ई/६९, सेक्टर ३, बेलपाडा, खारघर,
नवी मुंबई-४१०२१०, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, कै.रंजना श्रीधर माळगावकर यांचे दि.१० एप्रिल २०१९ रोजी रहेजा हॉस्पिटल, ऑल इंडिया इंन्स्टिट्युट ऑफ डायबेटीस, मुंबई येथे निधन झाले आहे. वरील मयत कै.रंजना श्रीधर माळगावकर यांचे नावे असलेले मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**फ्लॅट नं.३ : ४, तिसरा मजला, शिवदर्शन को.हौ.सोसायटी लि., प्लॉट नं.ई/६९, सेक्टर ३, क्षेत्र ४५.५३ स्क्वेअर मीटर बिल्टअप, बेलपाडा (जीईएस), खारघर, नवी मुंबई-४१०२१०**

अर्जदार क्रमांक १ ते ५ हे कै.रंजना श्रीधर माळगावकर यांचे कायदेशीर वारस आहेत. वरील मिळकतीबाबत अर्जदारांनी वारसाचा दाखला मिळणेकामी अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसाचे दाखल्याबाबत जे कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात दाखल करावी.

वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसाचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१२/०४/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मा.मुजावर साहेब कोर्ट

अर्जदारातर्फे वकील
विवेक सदाशिव तावडे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.५०८/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०८/०६/२०२२

१) श्री.प्रल्हाद सिताराम झुगे
वय : ६९, धंदा : शेती
२) जगदीश सिताराम झुगे
वय : ४९ वर्षे, धंदा : शेती
३) विकास सिताराम झुगे
वय : ४० वर्षे, धंदा : शेती
४) प्रतिभा सुनील भोईर
वय : ३९ वर्षे, धंदा : शेती
५) सुनिता सिताराम झुगे
वय : ३४ वर्षे, धंदा : शेती
६) सुभद्रा विजय झुगे
वय : ४७ वर्षे, धंदा : शेती
७) समिता विजय झुगे
वय : १९ वर्षे, धंदा : शेती
८) विधीका विजय झुगे
वय : १६ वर्षे, धंदा : शेती
९) विघ्नेश विजय झुगे
वय : १५ वर्षे, धंदा : शेती
सर्व रा.(कोल्ही)-कोपर, पोस्ट : पारगाव,
तालुका : पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र-४१०२०६ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविण्यात येते की, कै.मनीबाई सिताराम झुगे यांचे निधन दि.१०/०२/२०२० रोजी राहत्या घरी झाले आहे आणि अर्जदार १) श्री.प्रल्हाद सिताराम झुगे, २) जगदीश सिताराम झुगे, ३) विकास सिताराम झुगे, ४) प्रतिभा सुनील भोईर, ५) सुनिता सिताराम झुगे, ६) सुभद्रा विजय झुगे, ७) समिता विजय झुगे, ८) विधीका विजय झुगे, ९) विघ्नेश विजय झुगे सर्व रा.(कोल्ही)-कोपर, पोस्ट : पारगाव, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड, महाराष्ट्र-४१०२०६ यांनी या कोर्टात सदर मयत कै.मनीबाई सिताराम झुगे यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीचे वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**प्रस्तावित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व अनुषंगिक कामासाठी गावठाणातील संपादीत करण्यात येणाऱ्या जमिनीबद्दल व त्यामधील स्थलांतरित होणाऱ्या निवासी / वाणिज्यक / मिश्र वापराच्या बांधकामाबद्दल नुकसान भरपाईपोटी व पुनःस्थापनेसाठी भूखंडाचे वाटप पत्र क्रं.सिडको/अविट/पुनः स्थापना/कोपर/२०१५/३०६०/दिनांक : ०३/०८/२०१५ नुसार**
**प्लॉट नंबर २७, सेक्टर-आर ४, आर अँड आर पॉकेट नंबर-१, पुष्पक नोड, वडघर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड-४१०२०६**

कै.मनीबाई सिताराम झुगे यांच्या मृत्यूपश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. सदर वारसाव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब अर्जदार सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहेत. सदर वारसा व्यतिरिक्त इतर कोणाच्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारसदाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१२ माहे ०४ सन २०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मा.गोडसे सो यांचे कोर्टात

ॲड.सचिन पुंडलिक केणी

ये.का.मु.-२,००,०००-२००८-पीए४-(जे)२७० दिवाणी अ १५० ग.शा.नि न्या.वि.क्र.१९७९, दि.१२-२-१२
वारसाचे सर्टीफिकेटबद्दल जाहीरनामा

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर सो. येथील डिस्ट्रीक्ट कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.४४१/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१३/०६/२०२२

ज्यापेक्षा कै.गोपाळ राघो सुतार रा.वावंजे, ता.पनवेल, जि.रायगड हे दि.०४/०७/१९८० रोजी राहत्या घरी मयत झाले आहेत. सदर अर्जदार १) श्रीमती.वासंती मारुती पांचाळ, रा.घर क्र.१७८, लोखंडीपाडा, जुने पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड, २) श्रीमती.मंदा उर्फ राजेश्री राजेंद्र सुतार, रा.सदनिका क्र.३०१, आर्चिड सोसायटी, आर विंग, फेज २, चारोळी ४१२१०५, ३) श्री.समीर दिलीप साळसकर, रा.सदनिका क्र.३०१, आर्चिड सोसायटी, आर विंग, फेज २, चारोळी ४१२१०५, ४) श्रीमती.सुषमा उर्फ कमला दिनेश काणेकर, रा.टेंभोडे, ता.पनवेल, जि.रायगड, ५) श्री.प्रदीप दिनेश काणेकर, रा.टेंभोडे, ता.पनवेल, जि.रायगड, ६) भाग्यश्री दिनेश काणेकर उर्फ सौ.भाग्यश्री गिरीश काथारा, रा.नेवाळी, पो.आदई, ता.पनवेल, जि.रायगड, ७) श्रीमती.ज्योती उर्फ दर्शना दिपक पांचाळ, रा.रुम क्र.१, जुनी पत्रीचाळ, पारशीवाडी, कोपरी ठाणे, ८) श्रीमती.कुंदा राम सुतार, रा.नंदीमाळ नाका, ता.पेण, जि.रायगड, ९) श्री.दिपक राम सुतार, रा.नंदीमाळ, ता.पेण, जि.रायगड, १०) मनिषा राम सुतार उर्फ सौ.आदिती अभिजीत पांचाळ रा.भोईरवाडा, ता.कल्याण, जि.ठाणे
विरुद्ध
१) श्री.प्रकाश शंकर सुतार, रा.वावंजे, ता.पनवेल, जि.रायगड, २) लता शंकर सुतार उर्फ शुभांगी सुभाष चिंचवलकर, रा.वावंजे, ता.पनवेल, जि.रायगड, ३) श्री.सुर्यकांत सुभाष चिंचवलकर, रा.वावंजे, ता.पनवेल, जि.रायगड, ४) सुवर्णा सुभाष चिंचवलकर उर्फ सौ.सुवर्णा महेंद्र सुतार, रा.खेड, ता.खेड, जि.रत्नागिरी, ५) सुरेखा सुभाष चिंचवलकर उर्फ सौ.सुरेखा संतोष सुतार, रा.घणसोली गाव, ता.ठाणे, जि.ठाणे, ६) रंजना शंकर सुतार उर्फ सौ.अनिता अनंत ताम्हणकर, रा.मार्ग ताम्हणे, ता.खेड, जि.रत्नागिरी, ७) सौ.मिना रघुनाथ शिलकर, रा.वडवळ, ता.श्रीवर्धन, जि.रायगड, ८) श्री.संजय जगन्नाथ देवळेकर, ९) श्री.राजेंद्र जगन्नाथ देवळेकर, १०) श्री.नरेंद्र जगन्नाथ देवळेकर क्र.८ ते १० रा.चांभार्ली, पो.मोहोपाडा, रसायनी, ता.खालापूर, ११) मंदा जगन्नाथ देवळेकर उर्फ सौ.मंदा राजेंद्र गुरव, रा.तुपगाव, पो. चौक, ता.खालापूर, जि.रायगड, १२) श्री.रवींद्र विठ्ठल देवळेकर रा.नवीन वसाहत चौक, ता.खालापूर, जि.रायगड १३) श्री.राजेंद्र विठ्ठल देवळेकर, रा.नवीन वसाहत चौक, ता.खालापूर, जि.रायगड, १४) सुशांत मंगेश पांचाळ, रा.सालामती हिल, रुम क्र.८२, एम.ए.रोड, हनुमान टेकडीजवळ, रावळी कॅम्प, सायन कोळीवाडा मुंबई यांनी या कोर्टास सदरहू मयत कै.गोपाळ राघो सुतार यांचे नावे असलेली खालील वर्णनाच्या मिळकती संबंधी ते सदर मयतांचे वारस असल्याबाबत सर्टीफिकेट मिळावे असा अर्ज केला आहे.

**शेतजमीन मिळकतींचे वर्णन**
**मौजे : वावंजे, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.क्र. | गट क्र./स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | हि.नं. |
|---|---|---|---|---|
| १ | ९३ | ५ | लागवडयोग्य ०-०५-१०<br>पोटखराब ०-००-५०<br>एकूण ०-०५-६० | ०.०९ |
| २ | १०६ | १ | लागवडयोग्य ०-६१-४०<br>पोटखराब ०-०९-६०<br>एकूण ०-७१-०० | १२.६९ |
| ३ | १०३ | २ | ०-३-३० | ०.७५ |
| ४ | १०५ | १ | ०-१९-०० | ०.४७ |
| ५ | १२३ | ४ | लागवडयोग्य ०-३५-९०<br>पोटखराब ०-०१-५०<br>एकूण ०-३७-४० | ८.२५ |
| ६ | ६४ | ४ | ०-०१-०० | ०.०३ |
| ७ | ६४ | १ | लागवडयोग्य ०-०९-४०<br>पोटखराब ०-०२-००<br>एकूण ०-११-४० | १.०० |
| ८ | ६४ | ७ | लागवडयोग्य ०-१७-१०<br>पोटखराब ०-०१-००<br>एकूण ०-१८-१० | ०.६९ |

येणेप्रमाणे मिळकतीचे वर्णन आहे.

त्यापेक्षा अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीर नोटीसीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत, त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्यांचे हक्कांबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत कै.गोपाळ राघो सुतार यांचे कायदेशीर वारसाचे सर्टीफिकेट देईल.

तारीख १२ एप्रिल २०२२

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

